Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4 प्रा.श्रीमंत महादेव बिराजदार ISSN:-2230-7850

Research Papers

# शिक्षणातील समस्या : उपाय

**प्रा.श्रीमंत महादेव बिराजदार**
सिंहगड कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स,
नऱ्हे, पुणे 41

## प्रस्तावना :–

शिक्षणामुळे माणसाला सामर्थ्य मिळत. प्राथमिक शिक्षण चांगल्या पध्दतीने मिळणं, ही तर प्रत्येक माणसाच्या यशाची गुरूकिल्लीच असते. गेल्या काही वर्षामध्ये शिक्षण क्षेत्र हे फार वेगानं विस्तारत गेलं. गाव तिथं शाळा, शाळा तिथं वर्ग, वर्ग तिथं खोल्या, प्रत्येक वर्गाला शिक्षक, पिण्याचं पाणी, पोषण आहार, मुलांना कपडे, मुलांना पुस्तक काय म्हणून दिलं जात नाही शाळांमधून?'सर्वासाठी शिक्षण व शिक्षणासाठी सर्व' हे ब्रिदवाक्यच बनलं आहे.

**शोधनिबंध घोषवारा :**
प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शिक्षण हा मानवी जीवनातील एक महत्वाचा अविभाज्य घटक आहे. शिक्षणामुळे माणसाला कसे सामर्थ्य प्राप्त होते, शिक्षण ही कुण्या एका घटकाची मक्तेदारी नाही किंवा तिला गुणवत्तेच्या उच्चतम मर्यादा ही नसतात. जेवढी गुणवत्ता वाढवलीजाईल तेवढी ती वाढते. शिक्षणात आधुनिक काळात अनेक बदल होत आहेत. जसे की शासनाची तरतुद, भाषेत सुधारणा, संगणकाचा वापर, अध्यापकाचे अध्यापन कौशल्य, व्यवसायिक शिक्षण असे अनेक बदलांचा परामर्श या शोध निबंधात करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

शिक्षण क्षेत्रामध्ये भारताचा हिस्सा हा जगातल्या अन्य देशांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. एका बाजूला अनेक भारतीय उच्चशिक्षित, विदयाविभूषीत, तंत्रज्ञ जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये भव्यदिव्य स्वरूपाची कामगिरी करत असल्याचं दिसून येत आहे. परंतु दुसऱ्या बाजूचा अजुनही अनेक मुलं–विशेषतः ग्रामीण भागातील व शहरी झोपडपटयांमधील शिक्षणांपासून वंचित, प्रवाहापासून मागे पडलेली, शाळातून गळती झालेली अशी पाहायला मिळतात. शासनाच्या माध्यमातून प्रत्येक घटक हा शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सामील करून घेऊन त्याला प्रवाही बनविणे, हा उद्देश समोर ठेवून शासन सेवाभावी संस्था, इत्यादी कार्यरत आहेत. शिक्षणानं माणूस उभा राहतो परंतु त्यासाठी शिक्षणाचा दर्जा उत्कृष्ट असला पाहिजे. म्हणून पुढच्या कालावधीसाठी 'दर्जेदार शिक्षण' हाच खऱ्या अर्थानं सर्व घटकांसाठी एक 'दृढ संकल्प' असण्याची गरज आहे. गुणवत्ता ही काही कुण्या एका घटकाची, माणसाची, समाजाची मक्तेदारी नाही, गुणवत्तेचा उच्चतम मर्यादाही नसतात. जेवढी गुणवत्ता वाढविली जाईल तेवढी वाढते.

शिक्षणात जेवढी प्रगती झालेली दिसते तेवढयाच समस्याही यामध्ये आहेत यात फक्त शाळा संस्थांचेच नाही तर शासनाचा, समाजाचा, पालकांचाही हातभार, पाठबळ असावा यासाठी किंवा ज्ञान गुणवत्तापुर्ण, दर्जेदार होण्यासाठी ज्ञान देणारे, आणि ज्ञान घेणारे जे साहयभुत असणारी घटक आपली भूमिका प्रामाणिकपणे बजावली पाहीजे. हीच बाब दुर्देवानं काही अंशी कमी आहे. शिक्षणतज्ञ चिपळूनकर असे म्हणतात, की ''कोणत्याही समाजाचा दर्जा हा तेथील शिक्षणाच्या दर्जापेक्षा मोठा असू शकत नाही'' पण समाजाची गुणवत्ता, नितिमत्ता ही जर ढासळत असेल, कमी होत असेल तर त्याचा प्रमुख दोष हा शिक्षण क्षेत्रावरच येणार नाही का?शिक्षण यशस्वी होण्यासाठी या सर्व गोष्टी प्रमाणात असल्या पाहिजेत.

**Please cite this Article as :** प्रा.श्रीमंत महादेव बिराजदार **,** शिक्षणातील समस्या : उपाय **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

### उद्दिष्ट्ये :

1. प्रत्येक घटक हा शिक्षणामध्ये सामील करून घेणे
2. शैक्षणिक आधुनिक बदलांचा अभ्यास करणे.
3. शैक्षणिक दर्जा तपासून पाहणे.
4. शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
5. सर्वांसाठी शिक्षण योजना या घटकाचा अभ्यास करणे.

### संशोधन पध्दत :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रथम विषयाची रूपरेषा ठरवून विदयार्थ्यांचे गट मुलाखत घेण्यात आले, तसेच विषयानुसार प्रश्नावली तयार करून 20 शिक्षकांची प्रश्नावली संच भरून घेण्यात आले, आणि शेवटी महाविद्यालयातील मुख्याध्यापकांची प्रकट मुलाखत घेण्यात आला आहे.

या सर्व पध्दतीचा वापराबरोबर वर्तमानपत्र, मासिके, संगणक, पुस्तके इ.चा वापर करून निष्कर्ष काढण्यात आला आहे.

### शिक्षणासाठी करण्यात आलेली तरतुद :

आकडयांच्या पातळीवरून मोठी दिसत असली, तरी ती वरवरची आहे. एकुण राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केल्यास अर्थसंकल्पातील तरतूद तोकडी आहे. सहा ते चौदा वयोगटातील विदयार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी लागणाऱ्या निधीपैकी 55 टक्के निधी केंद्र सरकारने, तर 45 टक्के निधी राज्य सरकारने दयायची आहे. यामधील केंद्राच्या वाटयाच्या पूर्ण निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. आरोग्य व शिक्षणाकडे पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. उच्च शिक्षणाच्या वाटचालही फारसे काही मिळाले नाही अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळेल आणि चलनवाढ होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होण्याऱ्या समस्येमध्ये भाषेचाही वाटा आहे. शाळेत वापरली–बोलली – शिकवली जाणारी भाषा अनकालनीय असणं. हे मुलांच्या शाळेबाहेर पडण्याचं एक प्रमुख कारण आहे. विदयार्थ्यांच्या घरातल्या भाषेला शाळेत मानाचं स्थान देण्याची स्वागतार्ह सूचना या आराखडयात केलेली आहे. मुलांच्या घरच्या परिसराच्या भाषांना कवडीचीही किंमत न देता शाळेत शिकविल्या जाणाऱ्या 'प्रमाण' भाषेलाच 'शुध्द' अन् 'पवित्र' मानण्याच्या परंपरेला छेद देणारी ही शिफारस प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविली गेली तर कोटयवधी मुलांच्या शालेय शिक्षणाची सुरवात जास्त आत्मविश्वासानं होऊ शकेल.

### शैक्षणिक क्षेत्रात एक अभूतपूर्व मोहीम :

शैक्षणिक क्षेत्रात भाषेबरोबरच एक अभुतपूर्व मोहीम व अद्भुत सत्य म्हणजे 'पटतपासणी'. शाळेत होणारी विदयार्थ्यांची गळती यासाठी शाळांना मान्यता देणे त्यांची 'पट' पडताळणी करणे हे शिक्षण खात्याचे काम आहे. यासाठी प्रशासकीय व्यवस्था मंत्रालय पातळीपासून गाव पातळीपर्यंत उभी केली आहे तथापि, या व्यवस्थेचा असा 'लेखाजोखा प्रथमच झाल्याने, शिक्षण खात्याचा हा 'वरून किर्तन व आतून तमाशा' उघडकीस आला. शाळा काढणे, संस्था काढणे हे 'कर्मवीर भाऊराव पाटील' यांच्यासारख्या विभूतींनी समाज घडवण्याचे साधन मानले. त्यामुळे महाराष्ट्र शैक्षणिक क्षेत्रात इतर राज्यांच्या पुढे राहू शकला. गांधीजयंतीनंतर जोडुन सुट्टी घेण्याचा मोह सोडुन शाळेच्या पटपडताळणी कार्यक्रमास सलग तीन दिवस हजर राहणे भाग पडले. एखादया सार्वत्रिक निवडुकीपेक्षाही अधिक फौजफाटा वापरून शिक्षणक्षेत्राच्या पायाशी नेमका किती 'घोळ' आहे याचा अभ्यास झाला पाहिजे. शैक्षणिक विस्ताराचे प्राथमिक प्राधान्याचे काम शासनाने कंत्राट पध्दतीने अनुदान तत्वावर दिले. परंतु शाळांतील शिक्षक व त्यांचे वेतन, यांच्याबरोबर शाळेची इमारत, पिण्याचे पाणी, क्रीडागंण, ग्रंथालय, बैठक व्यवस्था, स्वच्छतागृहे यासाठी निधी लागतो. त्याबाबत शासनाने हेतूपूर्वक मौन बाळगलेले आहे. पटपडताळणी, बोगस शाळा, बोगस विदयार्थी, या माहितीसोबत एक महत्वपूर्ण धक्कादायक गोष्ट म्हणजे दर हजारी मुलींचे प्रमाण 810 पर्यंत असल्याचे स्पष्ट झाले असून सावित्रीच्या लेकी अदयापि शाळेतून गैरहजर आहेत.

### अध्यापकाचे अध्यापन कौशल्य :

सध्या शिक्षक आणि त्यांच्या शिक्षण कौशल्याबाबत अनेकदा प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी दर्जेदार शिक्षक असावा लागतो. एका संशोधनात असे सिध्द झाले आहे की सध्याच्या शिक्षकांपैकी 78 टक्के शिक्षकांनी इतर कुठली चांगली नोकरी मिळू शकली नाही म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारलयाचे या पाहणीवरून समोर आले आहे.

त्यामुळेच शिक्षणात आता इ–लर्निंग, इंटरनेट, व्हर्च्युअल क्लासरूम यांना महत्व येत आहे. व्हर्च्युअल क्लासरूमने बिनभिंतीची शाळा प्रत्यक्षात आणली. पण त्याबरोबर शिक्षकही बिनचेहऱ्याचा बनला. ही बाब कितीही खरी असली तरी शिक्षण क्षेत्रातील एका क्रांतीच्या उंबरठयावर उभे असताना आता तंत्रज्ञान नावाच्या शिक्षकाचीही शिक्षकदिनी आठवण ठेवावी लागणार आहे हेही वास्तव स्वीकारावे लागेल.

सर्वांसाठी शिक्षण योजना व शिक्षणाधिकार कायदयामुळे माध्यमिक शाळांमधील विदयार्थ्यांची संख्या वाढली आहे. 6 ते 14 वयोगटातील सर्वांना शिक्षण दयायचे झाल्यास येत्या पाच वर्षात 2 लाख कोटी रूपयांची आवश्यकता आहे. खासगी शाळांत जाणाऱ्या गरीब विदयार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळविण्यासाठी सरकारने निधी देण्याची गरज आहे. आणि आदिवासी किंवा दुर्गम भागात गरीब विदयार्थ्यांना जमेल एवढया खर्चात शाळा असाव्या. त्यात उत्तम शिक्षक नेमावा त्यामुळे तेथील विदयार्थ्यांचे जीवन सुधारेल. तसेच पुणे–मुंबई सारख्या शहरात कामधंदयासाठी अनेक लोक, कामगार येतात. त्यांच्या मुलांसाठी शाळेची व्यवस्था असावी असे मला वाटते.

बिगर इंग्रजी माध्यमातल्या सेमी इंग्रजीच्या धर्तीवर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये सामाजिक शास्त्रे, कला हे विषय मराठीतून शिकविण्याची तरतुद असावी. बिगर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये गणित–विज्ञान हे विषय इंग्रजीतुन शिकविले जातात त्याच धर्तीवर जर इंग्रजी माध्यमात मराठी आणायचं असेल तर गणित–विज्ञान हे विषय मराठीतून शिकवायला हवेत.

### शिक्षणाची व्याख्या :

विचारवंताच्या मतानुसार शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील –

1) ''शिक्षण म्हणजे सर्वांगीण सुंदर जीवन जगण्याचा मार्ग होय''

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

– स्वामी विवेकानंद

2) विधेविना मती गेली,
मतिविना नीती गेली,
नीतिविना गती गेली,
गतिविना वित गेले,
वित्तविना शुद्र खचले,
इतके अनर्थ एका अविदयेने केले.

– म.ज्योतीराव फुले

3) व्यक्ती आणि परमोच्च सत्ता (परमात्मा) यांना एकत्र आणणे.

– याज्ञवल्क्य ऋषी

4) अंतिम सत्याचा शोध घेण्यास मनाला सक्षमक करणे.

– गुरूदेव रवींद्रनाथ टागोर

5) बालकाचे अथवा व्यक्तीचे शरीर–मन आणि आत्मा यातील सर्वोत्कृष्टतेचा विकास करणे.

– महात्मा गांधी

6) बुध्दीचे प्रशिक्षण, अंतःकरणाचे उन्नयन आणि आत्माचे अनुशासन.

– डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन

7) शिक्षण म्हणजे वैयक्तिक विकास व चारित्र्य संवर्धन असून त्यासोबत सामाजिक विकासही जोडून येतो.

–पंडित जवाहरलाल नेहरू

8) शिक्षण ही सामाजिक, समता आणि स्वातंत्र्य यांचे संरक्षण व संवर्धन करणारी शक्ती आहे.

– डॉ.बाबासाहेब आंबेडकर

9) माणसाला खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात तसेच युध्दकाळात व शांततेच्या काळात न्यायाने, कौशलयाने आणि उदात्ततेने वागण्यास तयार करणे.

– जॉन मिल्टन

10) समग्र मानवी अस्तित्वाच्या आधारस्थानी असणारी न्याय व शक्ती या शाश्वत तत्त्वांबाबत बालकांना शिक्षित करणे.

– होरॅस मन

या सर्व थोर विचारवंतांच्या मतानुसार असे स्पष्ट होते की शिक्षण ही मानवी जीवनात किती महत्वाचे आहे.

***तक्ता क्र.1***
***प्रचलित शिक्षण पध्दतीतील समस्या***
***प्रश्नावली 20 शिक्षकांना देण्यात आली त्यावरून मिळालेली टक्केवारी पुढीलप्रमाणे***

| अ.नं. | समस्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| १) | शिक्षणाचे बाजारीकरण | ४०% |
| २) | वाढती विद्यार्थी संख्या | १०% |
| ३) | व्यवसाय शिक्षणाबद्दल अपुरी माहिती | १०% |
| ४) | प्राथमिक शिक्षण दर्जेदार नाही | १०% |
| ५) | अभ्यासक्रमातील पाठयक्रमांचा अतिरिक्त समावेश | १०% |
| ६) | पारंपारिक अध्यापन पध्दतीचा वापर | १०% |
| ७) | निधीची कमतरता | १०% |
| | एकूण | १००% |

वरील सारणीनुसार प्रचलित शिक्षण पध्दतीतील समस्यांचा विचार करता असे आढळून येते की, शिक्षणातील समस्या अनेक जरी असले तरी प्रामुख्याने शिक्षणाचे बाजारीकरण ही समस्या प्रामुख्याने आढळून येते. असे शिक्षकांच्या निरीक्षणावरून किंवा मागणीवरून दिसून येते ते टक्केवारीमध्ये सांगायचे झाले तर त्याचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 40 टक्के इतकी आहे. तसेच वाढती विद्यार्थीसंख्या, शिक्षणाबद्दल अपुरी माहिती इ. समस्यांचा प्रमाण समान प्रमाणात दिसुन येतो.

**Please cite this Article as :** *प्रा.श्रीमंत महादेव बिराजदार , शिक्षणातील समस्या : उपाय* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

*तक्ता क्र. 2*
*प्रचलित शिक्षण पध्दतीतील उपाय*

| अ.नं. | समस्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| १) | प्रशिक्षित शिक्षक वर्ग | २५% |
| २) | विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार व आवडीनुसार प्रवेश | ३०% |
| ३) | व्यावसायिक शिक्षण दिले जावे | १५% |
| ४) | शासन धोरणात बदल | ०५% |
| ५) | अभ्यासक्रमात बदल | ०५% |
| ६) | केंद्रिय पध्दतीने प्रवेश | ०५% |
| ७) | विद्यार्थी केंद्रीत शिक्षणपध्दती | ०५% |
| ८) | शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार कमी करणे | १०% |
| एकूण | | १००% |

वरील सारणीत प्रचलित शिक्षण पध्दतीतील उपाय सुचविते. या सारणीनुसार असे दिसून येते की, विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार व आवडीनुसार प्रवेश मुलांना शाळेत देण्यात यावे. या उपायासी बरचसे शिक्षकांची म्हणणे आहे. ते टक्केवारीच्या प्रमाणात सांगायचे झाले तर 30 टक्के इतके आहे आणि दुसऱ्या स्थानी प्रशिक्षित शिक्षक वर्ग असावा असे म्हणणे आहे. त्याच प्रमाणात विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देणे सुध्दा गरजेचे आहे. या उपायासी 15 टक्के शिक्षकांची सहमत आहे.
या तक्त्यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार शिक्षण दयावी म्हणजे जेणेकरून शैक्षणिक समस्या निर्माण होणार नाही.

***शैक्षणिक समस्या :***

1. अज्ञानपणा : भारतीय संस्कृतीमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. 70 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे लोकांचे शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कमी स्वरूपात दिसून येतो.
2. रूढी परंपरा : जुन्या चालीरितीमुळे वडिलोपार्जित व्यवसाय चालविण्यासाठीच जास्त प्राधान्य दिले जाते. त्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.
3. गरीबी : ग्रामीण भागात दारिद्रय, गरीबी, अज्ञानपणा जास्त प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसतो म्हणून शैक्षणिक खर्च त्यांना परवडण्यासारखा नसतो.
4. लोकसंख्या : भारतामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्येमध्ये वाढ होत असून या लोकसंख्येला पुरेसे शाळांची कमतरता दिसून येते.
5. शासनाची ध्येय धोरण : शासनाची ग्रामीण भागातील शाळांसाठी जे ध्येयधोरण अंवलंबिले जातात. ते प्रत्यक्षपणे अंमलबजावणी झालेले आहे असे दिसून येत नाही.
6. समाजाचा दृष्टिकोन : भारतीय समाजाचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा दिसून येतो. शिक्षण घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नोकरीची संधी उपलब्ध होतेच असे दिसून येत नाही. त्यामुळे शिक्षणाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन अगदी वेगळा असतो.
7. पालक : प्रत्येक पालकाला आपल्या घरात उत्पन्नाची साधणे कोणती तर मुले. प्रत्येक कुटूंबातील व्यक्ती जर कमवत असेल तर त्याला कशाचीही उणीव भासणार नाही. त्यामुळे पालक स्वतः मुलांना शिक्षण घेण्यास विरोध करतात.
8. शिक्षणातील वाढती फी : दिवसंदिवस वाढत्या शिक्षणातील फी मुळे पालकांना तो खर्च पेलण्यासारखा नाही.त्यामुळे बरेचसे विदयार्थी शाळांपासून वंचित राहतात.
9. शषेचा वाटाः शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्येमध्ये शषेचाही वाटा आहे. शाळेत वापरली, बोलली, शिकविली जाणारी शषा अनाकलनीय असणे हे मुलांच्या शाळेबाहेर पडण्याचे एक प्रमूख कारण आहे
10. दर्जेदार शिक्षक : शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी दर्जेदार शिक्षक असावा लागतो पण प्रामुख्याने त्याची उणीव भासते.

***उपाय***

1. शिक्षणानं माणूस उभा राहतो, परंतु शिक्षणाचा दर्जा उत्कृष्ट असला पाहिजे,
2. शिक्षकांनी / संघटकांनी दर्जेदार शिक्षणाचे कार्यक्रम वैयक्तिक अजेंडा म्हणून सुरू केला पाहिजे.
3. शिक्षकांनी स्वतःच्या कामांमध्ये प्रामाणिक राहीले पाहिजे.
4. जिल्हापरिषदांच्या किंवा महापालिकांच्या शाळा या प्रामुख्याने गरीब, मागासवर्गीय, शेतकरी, आदिवासी, बहुजन समाजाच्या मुलांना

शिक्षण देण्याचं काम करतात आणि ज्यांना आर्थिकदृष्टया परवडतं त्यांची मुलं खासगी संस्थांच्या चांगल्या शाळांमधून शिक्षण घेतात. खरा दुर्लक्षित घटक हा जिल्हा परिषद किंवा नगरपालिकांच्या शाळा आणि या शाळांमधील विदयार्थी, सरकारी शाळांमध्ये शिक्षकांच्या माध्यमातून या शिक्षकांवर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून बजावली जात असलेली भूमिका ही जर प्रामाणिक आणि मनापासून नसेल, तर या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक दृष्टया मागे राहीलेल्या विदयार्थ्यांना पुढे येण्याची संधी कशी मिळेल?आणि म्हणूनच सरकारी शाळांमधील शिक्षकांची जबाबदारी ही खासगी शाळांमधील शिक्षकांच्या जबाबदारीपेक्षा फार मोठया स्वरूपाची आणि आव्हानात्मक आहे. आमच्याकडे विदयार्थी बाहेर पडताना त्याच्या पंखांमध्ये भरपूर बळ घेऊन कसा भरारी मारेल, हे पाहण्याची गरज आहे.

5. अध्यापकाचे अध्यापनकौशल्यही विकसित व प्रभावी असावी लागते.

6. शैक्षणिक क्षेत्रात शिक्षक विदयार्थी संबंध हे फक्त बौध्दिक पातळीवरचे नसून सामाजिक, भावनिक पातळीवरही असावेत.

7. तसेच समाज व विदयार्थी शिक्षकांकडे एक आदर्श म्हणून पाहतात. शिक्षणप्रक्रियेतील स्वतःचे स्थान ओळखून ती भूमिका शिक्षकाने पार पाडणे अपेक्षित असते.

8. शिक्षकाचे व्यक्तिमत्व, जीवनविषयीचे तत्त्वज्ञान, पेशाविषयी दृष्टिकोन, अभ्यासविषयातील प्राविण्य याचा परिणाम अध्यापनावर होत असतो त्यामुळे शिक्षकांनाही विशिष्ट प्रशिक्षणाची सोय करावी.

9. आधुनिक जगामध्ये संगणकाला जास्त महत्व दिले जाते. आता व्हर्च्युअल क्लासरूममुळे शिक्षणाच्या संकल्पनाच बदलून गेल्या आहेत प्रत्यक्ष शिक्षक हा फॅसिलिटेटरच्या भूमिकेत गेला आहे, नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेतानाच विदयार्थ्यांच्या बरोबर राहण्यासाठी शिक्षकांना कधीकधी विदयार्थ्यांच्या भूमिकेत शिरावे लागते. यावेळी शिक्षकांचा शिक्षकही तंत्रज्ञानच असावा लागतो. नवी पिढी टेक्नोसॅव्ही होत असलयाने तंत्रज्ञानच उदयाचा काळाचा शिक्षक असणार हे वास्तव सत्य आहे.

10. शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती करावयाची असल्यास धोरणांमध्ये प्रगती करावी लागेल. देशातील तरूणांची संख्या विकसित देशांत सर्वाधिक आहे पण आव्हानही मोठे असणार आहे. देशातील 70 टक्के लोक 2025 मध्ये काम करणाऱ्या वर्गामध्ये असतील त्यामुळे माध्यमिक शिक्षणाची सहज उपलब्धता, संशोधकांचे प्रमाण वाढविणे, विविध कौशल्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. युवकांना रोगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी केंद्र सरकारतर्फे चालविल्या जाणाऱ्या 'व्यावसायाभिमुख माध्यमिक शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.

*सारांश :*

शिक्षण हा मानवी आयुष्यातील एक अविभाज्य अंग आहे. शिक्षणामुळेच माणसाला सामर्थ्य मिळते. तसेच त्याचा सर्वांगीण विकास होतो म्हणूनच असं म्हणतात की, एका मुलीला शिक्षण दिले तर तिच्या दोन्ही घरचा उद्धार होतो. दर्जेदार शिक्षण मिळविण्यासाठी केवळ शाळा, संस्था, शासन यांचाच योगदान महत्वाचा नसुन समाज, पालक याचाही हातभार असावा लागतो. आधुनिक शिक्षण पध्दतीमुळे देशात जेवढी प्रगती होत आहे तेवढीच अधोगती होत असलेली दिसून येते. उदा.बालगुन्हेगारी, चोरी, व्यसनाधिनता इत्यादी मोठया प्रमाणात होत असलेली दिसून येते त्यामुळे आम्ही आधुनिक शिक्षणपध्दतीचा स्वीकार जरी केला तरी कुठेतरी आम्हास असे वाटते की पुर्वीची जी गुरूकुल पध्दत योग्य होती असे वाटते. त्यामुळे शैक्षणिक सुधारणांमध्ये सर्वांचा योगदान असणे गरजेचे आहे.

*संदर्भ ग्रंथ :*

***1.प्रभाकर वीरकर, प्रतिभा वीरकर (2007),*** उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
***2.दत्तात्रेय तापकीर, निर्मला तापकीर, (2002),*** शिक्षणाचे तात्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
***3.विश्वंबर कुलकर्णी, विनायक रामचंद्र भिंताडे (2007),*** भारतीय आधुनिक शिक्षण : समस्या आणि उपाय, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
***4.सुरेश करंदीकर, मीना मंगरूळकर, (2002),*** उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
***5.अरविंद दुनाखे (2007),*** उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
***6.शांता मालेगावकर (2007),*** आजचे शिक्षण : एक वास्तव, विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे.
***7.बी.बी.पंडित, नलिनी पाटील, लता मोरे (2009),*** शिक्षक शिक्षण, पिंपाळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

**Please cite this Article as :** *प्रा.श्रीमंत महादेव बिराजदार , शिक्षणातील समस्या : उपाय* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**